**सामान्य प्रशासन विभाग,**

**आस्थापना विभाग, पुणे मनपा.**

**जा.क्र. :-** आस्था/५७९८

**दिनांक :-** २७/११/२०२०

**-: कार्यालयीन परिपत्रक :-**

विषय :- पुणे महानगरपालिकेत नव्याने समाविष्ट करणेत आलेल्या अकरा तत्कालीन ग्रामपंचायतीच्या आस्थापनेवरील पुणे महानगरपालिकेत समावेश केलेल्या कर्मचाऱ्यांबाबत.

**संदर्भ :-** १) नगरविकास विभाग यांचेकडील अधिसूचना दि. ०४ ऑक्टोबर, २०१७.

२) आज्ञापत्र, जा.क्र. :- मआ/साप्र/आस्था/प्र-७ /९९३८, दि. ०८/०२/२०१९.

३) आज्ञापत्र, जा.क्र.:- मआ/साप्र/आस्था/प्र-७/४०२६, दि. २७/०८/२०१९.

४) कार्यालयीन आदेश, जा.क्र.:- साप्र/आस्था/प्र-७/१११२६, दि. २०/०३/२०१९.

५) शुद्धीपत्र जा.क्र. मआ/साप्रवि/आस्था/प्र-७/३४३८,दि.०३/०८/२०१९.

६) शुद्धीपत्र जा.क्र. मआ/साप्रवि/आस्था/प्र-७/८०००,दि.२३/०१/२०२०

७) आदेश जा.क्र. मआ/साप्रवि/आस्था/प्र-७/२२७३,दि.०८/०७/२०२०.

नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांनी पारित केलेल्या संदर्भ क्र. १ च्या अधिसूचनेनुसार अकरा तत्कालीन ग्रामपंचायतीचे क्षेत्र पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत समाविष्ट करण्यात आले आहे. त्यानुसार समाविष्ट तत्कालीन अकरा ग्रामपंचायतीच्या आस्थापनेवरील कर्मचारी वर्ग महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४९३ परिशिष्ट ४ मधील ५(क) च्या तरतुदीनुसार संदर्भ क्र. २ अन्वये ४९३ कर्मचारी यांचे व संदर्भ क्र. ३ अन्वये ७ कर्मचारी यांचे काही अटी व शर्तीच्या अधीन राहून पुणे महानगरपालिकेत समावेश करण्यात आलेले आहे. त्यानुषंगाने काही अटी व शर्तीनुसार पूर्तता झाली किंवा नाही याची खात्री खालील प्रमाणे करणे आवश्यक आहे.

१) संदर्भ क्र. २ च्या आज्ञापत्रातील अट क्र. १२ खालील प्रमाणे आहे.

अट क्र. १२) मागासप्रवर्गातील सेवकांनी सदर आज्ञापत्रकाचे दिनांकापासून सहा महिन्याचे आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. ते सादर न केल्यास त्यांना सेवेतून कमी करण्याची कार्यवाही करण्यात येईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.